## प्रकरण तिसरे

## "माझा गाव" कादंबरीचे विशेष

# प्रकरण तिसरे

## "माझा गाव" कादंबरीचे विशेष

### अ नु क्र म णि का


१) प्र स्ता व ना

२) "माझा गाव" : कथानकाचे स्वरूप

३) "माझा गाव" : आशयसूत्र

४) "माझा गाव" : व्यक्तिचित्रण

५) "माझा गाव" : सामाजिकतेचे चित्रण

६) "माझा गाव" : भाषाशैली

७) "माझा गाव" : निवेदन

८) सा रां श

९) सं द र्भ


......

## प्रकरण तिसरे

## "माझा गाव" कादंबरीचे विशेष

### प्रस्तावना:

रणजित देसाई हे आदर्शवादी जुन्या, परंपरामधील सात्त्विकतेचे पूजक. जीवनाकडे रोमँटिक कल्पनारम्य दृष्टीने बघणारे. जुन्या चांगल्या परंपरेचे होणारे उच्चाटन आणि नव्या काळातील समाजाच्या विविध घटकात वाढत जाणारा बेबनाव. त्यामुळे घराघरात सुरु झालेली भाऊबंदकी आणि स्वार्थीपणा. या संघर्षात माणसातील माणूसकीचा होत जाणारा लोप. याचा अत्यंत अस्वस्थ करणारा अनुभव पुन: पुन्हा त्यांना येत राहिला. शरच्चंद्र, खांडेकरांच्या साहित्याच्या वाचनाने अंकुरलेले मानवतावादाचे, आदर्शवादाचे आकर्षण आणि वास्तव जीवनात त्या मानवतावादाला व आदर्शवादाला पत्करावा लागणारा पराभव. यामुळे जुन्यातल्या चांगुलपणाचे गुणगान करणाऱ्या, आणि बदलत्या समाजस्थितीतील खटकणाऱ्या घटनांचे चित्रण करण्याची ओढ, "रणजित देसाई" यांना लेखनास प्रवृत्त करत असावी. यातूनच त्यांची "माझा गाव" ही कादंबरी साकार झाली आहे.

### "माझा गाव" कथानकाचे स्वरूप:

"माझा गाव" कादंबरीत स्वातंत्र्यपूर्व काळातील जुने खेडेगाव रणजित देसाई यांनी चित्रित केलं आहे. या गावात असणारा इनामदार, त्यांचा गावावर असणारा वचक. तसेच गावातील आरण्ण कर्मा, त्यांची समाजसेवी वृत्ती. त्यांच्यावर असणारा गावकऱ्यांचा विश्वास. गावकरी मंडळींची असणारी पारंपरिक वृत्ती. संकटकाळी एकमेकाना मदत करण्याची वृत्ती. या सर्वातून या कादंबरीचे कथानक निर्माण झाले आहे.

"माझा गाव" कादंबरीचे संपूर्ण कथानक आप्पासाहेब इनामदार यांच्या वाड्याभोवतीच घडले आहे. स्वतंत्र्यपूर्व काळात इनामदार घराण्याशी संबंध असलेल्या ग्रामीण भागातील लोकांच्या स्वभावातून, वागण्यातून, बोलण्यातून हे कथानक साकार होते.

कादंबरीच्या सुरवातीस लहानपणी याच गावची रहिवाशी असणारी "तात्या" ही व्यक्ती गावात येते. तात्या आप्पासाहेबांचे लहानपनीचे मित्र असल्यामुळे सतत वाड्यावर येत असतात आणि गावच्या ब-या वाईट गोष्टींची चर्चा करीत असतात व गावच्या भल्यासाठी झटत असतात. यातूनच या कादंबरीचे कथानक पुढे सरकते.

ग्रामीण भागात मुख्य व्यवसाय शेती असल्यामुळे, ज्या लोकांकडे शेती नाही, असे लोक, जास्त शेती असणा-या शेतक-यांच्या शेतावर राबत असतात किंवा रयतानं मोठ्या जमीनदारांची जमीन करत असतात. या कादंबरीमध्येही आप्पासाहेब भोसले इनामदार यांचे जुने रयत "भोगन" हे रयतावर आप्पासाहेबांची जमीन करत असतात व त्याच्यावर आपले पोट भरत असतात. अशा प्रकारे ग्रामीण भागातील सामान्य जनता, मोठ्या शेतक-यांच्यावर कशी आधारित असते, याचे चित्रण केले आहे.

खेडेगावातील परंपरावादी लोक वरच्या वर्गातील लोकांचा मान राखत असतात. "माझा गाव" कादंबरीमध्येही, जत्रेच्यावेळी इनामदारांच बकरे पहिल्यांदा पडल्याशिवाय गावकरी मंडळी बकरी पाडीत नाहीत. याचप्रमाणे दस-याच्या दिवशी सोने लुटण्याचा मान इनामदारांचा असतो. म्हणून सर्व लोक खोळंबुन असतात. आणि आप्पासाहेबांचा लहान मुलगा जयवंताने सोनं लुटताच सर्व लोक सोने लुटतात. या प्रसंगातून खेड्यापाड्यातून अनेक वर्षापासून रूढ असणा-या, सांस्कृतिक परंपरेचे, मानमरातबाचे, मानपान देण्याघेण्याच्या प्रकाराचे चित्रण वरील प्रसंगातून आलेले दिसते.

मध्यंतरीच जत्रेत रावबाची व हौसाची भेट होते. व त्यांच्यात अनैतीक संबंध निर्माण झालेला दिसतो. त्यामुळे गावात रावबाबद्दल बोलबाला होतो. यामुळे आपल्या इनामदार घराण्याची अब्रू जाईल. म्हणून आप्पासाहेब स्वत:च्या मुलाला चाबकाने मारायला मागेपुढे पहात नाहीत. पण तात्या मध्ये पडून रावबाचा मार वाचवतात. रावबाचे हे विचित्र वागणे आप्पासाहेबांच्या प्रतिष्ठेला न शोभणारे आहे. पुढे या प्रकरणातून विठूचा खून रावबाच्या हातून होतो. मग सारा गाव इनामदारांच्या विरूद्ध होतो. विठूचा वडील बजाबा रावबाविरूद्ध केस घालतो. पण यातून रावबाची निर्दोष सुटका होते आणि गाव पूर्ववत शांत होतो.

पुढे आप्पासाहेब गावच्या हिताकरिता परत कामाला लागतात. गावात पटकीची साथ येते. त्या पटकीत गावातील माणस मरत असतात. त्याकरिता आप्पासाहेब, तात्या लोकांची काळजी घेतात. औषध पाण्याची व्यवस्था करतात. मयताची विल्हेवाट लावतात. तसेच गावावर ओला दुष्काळ जेंव्हा पडतो. तेंव्हा खायाला अन्न नाही म्हणून सारा गाव चिंतेत असतो. त्या-साठी इनामदार आपल्या घरातील धान्य गावातील लोकांना देतात. तसेच तारणीकरांच्याकडून कर्जावू पैसे घेवून लोकांना धान्य पुरवठा करतात. पण गावाला धान्य कमी पडू देत नाहीत. पुढे तारणीकरांचे कर्ज भागविण्यासाठी स्वत:ची जमीन विकायला तयार होतात. पण गावकरी मंडळी आप्पासाहेबांना जमीन विकू देत नाहीत आणि पाच-दहा रुपये जमा करून तारणीकरांचे देणे भागवितात. म्हणजे गावाला आप्पासाहेबांबद्दल आणि आप्पासाहेबांना गावाबद्दल आपुलकी वाटते. याचे चित्रण लेखकाने अशा अनेक प्रसंगातून केलेले दिसते.

कथानकामध्ये लेखकाने ग्रामीण भागातील कौटुंबिक वातावरणाचेही चित्रण केले आहे. हे कौटुंबिक वातावरण आप्पासाहेब, उमा, जयवंत,

तात्या-काकी यांच्या परस्पर संबंधातून व संवादातून दिसून येते. आप्पासाहेब उमाला स्वत:च्या मुलीच्या स्थानी लेखतात. आणि प्रत्येक बाबतीत तिची काळजी घेतात. उमाही आपल्या सासऱ्याचा आदर राखते. तसेच उमा जयवंताला आईचे प्रेम देवून त्याचे सर्व लाड पुरविते. जयवंतही आपल्या वहिनीला आईच्या स्थानी लेखतो. यातूनच दिर-भावजचे जिव्हाळ्याचे नाते निर्माण होते. त्याचप्रमाणे उमा आपल्या नवऱ्याची (रावबाची) काळजी घेत असते. तसेच आपल्या घराण्याच नाव रावबाने, जयवंताने राखावे. म्हणून आप्पासाहेब वेळोवेळी त्याना चांगल्या गोष्टींचा सल्ला देतात. म्हणून ते रावबाला शेतीकडे लक्ष घायला सांगतात. तर जयवंताने शाळा शिकावी म्हणून तात्या-काकींच्याकडे पाठवितात. जयवंतही तात्या-काकींच्याकडे जावून शिक्षण घेत असतो. तात्या-काकींनाही मुलेबाळे नसल्यामुळे जयवंतला ते आपल्या मुलाप्रमाणे वागवितात. पुढे उमाला मुलगा (यशवंत) होतो. मग तर जयवंत, आप्पासाहेब, रावबा, तात्या-काकी या सर्वांचा वेळ त्याला खेळवण्यात जातो. अशा प्रकारे आप्पासाहेबांच्या घरातील खेळकर वातावरण लेखकांने चित्रित केले आहे.

शेवटी गावावर दरोडा पडणार म्हणताच, तात्या, आप्पासाहेब गावकऱ्यांना धीर देतात आणि गावकऱ्यांना वाड्यावर बोलवून दरोडा परतावून लावण्यासाठी योग्य सल्ला देतात. त्याप्रमाणे दरोडा परतावून लावतात. पण त्यात आप्पासाहेबांचा मृत्यू होतो. याचे दु:ख सर्वांना होते. आणि आप्पासाहेबांच्या पाठोपाठ तात्या-काकी यांचाही मृत्यू होतो. मग तर गावकऱ्यांना अधिकच दु:ख होते. अशा प्रकारे खेड्यापाड्यातील माणसां-माणसांचे संबंध अतिशय जवळचे असतात. सारा गाव म्हणजे एक कुटुंब असे गावचे स्वरूप असते. ह्या गोष्टीची लेखकाला चांगली माहिती असल्याने, त्यासंबंधीचे चित्रण लेखकाने चांगल्या प्रकारे केले आहे. आणि स्वातंत्र्यपूर्व काळातील जुने खेड "रणजित देसाईंनी" या कादंबरीत चित्रित केले आहे.

"माझा गांव" आशयसूत्र:

या कादंबरीत इतर प्रादेशिक कादंबरीपेक्षा वेगळ आशयसूत्र पहावयास मिळते. या कादंबरीचे आशयसूत्र तिच्या प्रादेशिकतेच्या वैशिष्टयातूनच निर्माण होत. स्वातंत्र्यपूर्व काळातील एक जुनं खेडेगाव. त्या खेड्यातील सरकारी इनामदार घराणे. गावातील रूढीप्रिय लोक. हे लोक संकटकाळी एकमेकाना कसे मदत करतात. इनामदारांचा, ब्राह्मणांचा कसा मान राखतात. या वैशिष्टयातूनच या कादंबरीचे आशयसूत्र उभे राहीले आहे.

"माझा गाव" या कादंबरीच्या भावविश्वाचा पसारा अगदी छोटेखानी आहे. इनामदारी वतन असलेल्या गावामधील जुनी समाज रचना. इनामदार घराण्याचे गावावर असलेले वर्चस्व. इनामदारांच्या शब्दाला गावात असलेला मान. त्याचप्रमाणे गावातील तात्या ब्राह्मणांना असलेले महत्व. तात्याची गावाकरिता कष्ट घेण्याची वृत्ती. तसेच गावातील शेतकरी कुळे, बलुतेदार आणि दलित वर्ग यांनी आपापल्या पायरीने राहण्याची पध्दत. जुन्या-काळातील रूढ संकेताप्रमाणे असणा-या विशिष्ट स्थानाबद्दल रास्त अभिमान. त्यानुसार परस्पर सहकार्याने चालवलेला गावगाडा. गावातील देवधर्म, जत्रा, उत्सव याकेळचे परंपरागत मानपान आणि अधिकार. गावात आल्यागेल्यांचे स्वागत करण्याचे शिष्टाचार. याचे नेमके भान रणजित देसाईंना आहे. तसेच राजघराण्यातील रितीरिवाज आणि आचारपरंपरा याचे बाळकडूही त्यांना मिळालेले आहे. यातूनच या कादंबरीचे आशयसूत्र निर्माण केले आहे.

या कादंबरीत भावनाउद्दीपनासाठी प्रणयक्रिडा वर्णने नाहीत. निसर्ग-वर्णने नाहीत. तसेच आदर्श इनामदार घराणे रेखाटण्याचा मोहही पडला नाही. की आदर्श गांधीवादी ब्राह्मण रेखाटण्याचा मोहही पडला नाही. ही एका पुरुषाची, स्त्रीची कथा नाही. तर ती एका गावची व त्या गावात राहणा-या सरकार इनामदार घराण्याची, व त्या घराण्यावर आधारीत

असलेल्या गावातील सामान्य लोकांची ही कथा आहे.

गावातील काही परंपरावादी लोक इनामदारांच्या सेवा चाकरीला राहतात. त्यांची रयतावर जमीन करतात. दिला शब्द धुंकीसारखा झेलतात. गावातील जत्रा असो, दसऱ्याचा सण असो, किंवा इतर कोणताही महत्त्वाचा समारंभ असो. यावेळी गावातील लोक आपल्या इनामदारांना मानाचे स्थान देतात. पण मध्यंतरीच हौसा-रावबा प्रकरणातून हौसाच्या नवऱ्याचा खून रावबाच्या हातून चुकून होतो. म्हणून सारा गाव इनामदारांच्या विरोधात जातो आणि विठूचा वडील बजाबा रावबा विरुद्ध केस घालतो. पण रावबाची त्यातून निर्दोष सुटका होते आणि पूर्ववत गाव शांत होतो. ओला दुष्काळ, पटकीची साथ दरोडा यासारखी अनेक संकटे गावावर येतात. या प्रत्येक संकटाच्यावेळी आप्पासाहेब कावकऱ्यांना मदतीचा हात पुढे करतात आणि गावावरील संकटे दूर करतात. तसेच या गावातील तात्या ब्राह्मणाही गावच्या लोकांच्या हितासाठी झटत असतात आणि शेवटी आप्पासाहेब, तात्या, काकी हे गावचे आधारस्तंभ गेले म्हणून सारे गावकरी हळहळतात. या सर्वातून "माझा गाव" कादंबरीचे आशयसूत्र उभे राहिले आहे.

एकूण, स्वातंत्र्यपूर्व कालातील एक जुने खेडेगाव "माझा गाव" या कादंबरीत रणजित देसाईंनी उभे केले आहे. जुन्या खेड्यातील माणूस स्वत:ला समाजासाठी कसा वाहून घेतो. हा माणूस कसा होता. छोट्या खेड्यात एकाचा दुसऱ्याशी कसा संबंध असतो. गाव कस एकसंघ असतं याचे चित्रण येते. संकटकाळी, वेळप्रसंगी या गावातील माणसे एकमेकांना कशी मदत करतात. एकजुटीने कशी राहतात याचे चित्रण "माझा गाव" या कादंबरीमध्ये आले आहे.

"माझा गाव" व्यक्तिचित्रण:

आप्पासाहेब इनामदार:

कादंबरीतील ही महत्त्वाची व्यक्तीरेखा असल्यामुळे संपूर्ण कादंबरी या व्यक्तिरेखेभोवती फिरताना दिसते. परंपरावादी खेडेगावातील ग्रामीण

जनतेला बडे जमीनदार यांचा मोठा आधार कसा असतो. याचा परिचय करून देण्यासाठीच या पात्राची लेखकांने निर्मीती केली आहे. या आप्पासाहेबांचा दरारा केवळ गावावरच होता असे नाही. तर आसपासच्या गावावरही त्यांचे वजन होते. म्हणूनच घरातील नोकरचाकरापासून सारा गाव त्यांना मान द्यायचा.

- हे इनामदार जाणकार आणि प्रेमळ आहेत. म्हणूनच आपल्या बालपणीचे मित्र तात्या भटजी कोल्हापूरहून आलेत. हे समजताच त्यांना घरी बोलवून घेतात आणि जुन्या आठवणी काढून त्यात रंगून जातात व त्यांना शिधा पोहोचविण्याची व्यवस्था करतात. तात्या नको म्हणताच, "तसं नव्हे तात्या आमचं कर्तव्य आहे ते. तात्या काही लागलं सवरलं तर संकोच करू नका वाडा तुमचा आहे. आम्हाला परकं मानू नका."[१](पृ.१०) यावरून आपल्या बालपणीच्या मित्रावरील त्यांचे प्रेम, आपुलकी दिसून येते.

- हे इनामदार जाणकार, प्रेमळ आहेत. तसेच प्रसंगी रागीट आणि तापट ही आहेत. कारण त्यांचे जुने रयत भोगन, खंड भागविण्यासाठी बैलाची जोडी, सावकाराकडे गहाण ठेवून, पैसे आणल्याचे सांगताच आप्पासाहेब म्हणतात, "बोलू नकोस हरामखोर लेकाचे. फार शेफारलात तुम्ही जनावार गहाण टाकून खाणार काय ? पोर किती ?"[२](पृ.१६) असं म्हणून बैलाची जोडी सोडवून आणायला सांगतात. म्हणजे गोरगरीबाबद्दल त्यांना दया होती हे स्पष्ट होते. तसेच आपल्या घराण्याची अब्रू जाऊ नये म्हणून, हौसा प्रकरणापायी स्वतःच्या पोराला चाबकाने मारतात. तात्या आडवे येताच, "सोडा तात्या ! असली पोरं पोटाला असण्यापेक्षा नसलेली परवडली."[३] (पृ.६७) यावरून आपल्या घराण्याच्या इभ्रतीची चिंता त्यांना असते हे दिसून येते. पण रावबाकडून विठूचा खून होतो आणि आजपर्यंत दबकून असणारा गाव त्यांच्या विरुद्ध जातो. याचा मनस्वी ताप आप्पासाहेबांना होतो. पण

आप्पासाहेब गावच्या प्रेमापोटी गावाविरुध्द जात नाहीत. तसे ते तात्यांना बोलुनही दाखवितात, "आणि म्हणून बेरड बोलवू ! गावचे लोक मारायला ! तात्या विसरता तुम्ही गावचा इनामदार आहे मी. मारेकरी नाही. ते माझ्या हातून केव्हाही व्हायचं नाही." [४] (पृ.१११) यावरुन त्यांचं गावावर किती प्रेम होत हे स्पष्ट होते. विठूच्या खूनापायी कोर्ट कचे-या खेळाव्या लागतात. याचाही ताप आप्पासाहेबांना होतो आणि रावबाला यातून निर्दोष सोडवितात. पण मनातून मात्र रावबाच्या या कृत्याबद्दल दु:खी होतात. यावरुन आप्पासाहेबांचे जितके आपल्या मुलावर प्रेम आहे. तितकेच प्रेम गावातील लोकांवरही आहे. त्यामुळे मुलाच्या गुन्ह्यासातर गावाला दूर लोटता येत नाही आणि गावच्या भल्यासाठी आपल्या मुलाचा गुन्हाही पाठीशी घालता येत नाही. अशा काहीएक अडचणीच्या अवस्थेत इनामदार सापडलेले दिसतात. या गोष्टीचे चित्रण लेखकाने चांगल्याप्रकारे केले आहे.

आपल्या गावाबद्दल आप्पासाहेबांना प्रेम, आपुलकी आहे. त्यामुळे जत्रेच्यावेळी, दस-याच्या सणाच्यावेळी गावक-याबरोबर यात सामील होतात आणि या सणासुदीच्या दिवसाचा आनंद लुटतात. यावरुन आप्पासाहेबांची सर्वसामान्य माणसात मिसळण्याची वृत्ती दिसून येते. आप्पासाहेब आनंदाच्या प्रसंगी जसे गावक-यात मिसळून कार्य करतात. तसेच संकटाच्यावेळीही गावक-यांना मदत करतात. पटकीच्या साथीत माणसे मरत असतात म्हणून त्यांच्या औषध-पाण्याची स्वत: व्यवस्था लावतात व मयत लोकांची योग्य विल्हेवाट लावतात. आणि तात्यांनी सुरक्षिततेसाठी बेळगावला जाण्यास सांगताच, आप्पासाहेब म्हणतात, "गावात जोपर्यंत एक माणूस शिल्लक आहे. तोपर्यंत मलाही जाता येणार नाही. गावचा इनामदार पळून गेला तर गावाची छाती फुटेल." [५] (पृ.२७४) यावरुन त्यांचे गावक-यांवरील प्रेम, निष्ठा दिसून येते. तसेच ओला दुष्काळ पडला म्हणून गावकरी गाव सोडून जाणार हे कळताच, "इनामदार

मेला काय रे ह्या ओल्या दुष्काळात ? गावची तरणी पोरं बाहेर भिकेला गेली. तर जग शेण घालील तोंडात, तुमच्या नाही माझ्या !" [६](पृ.१८८) म्हणजे गावच्या इभ्रतीची काळजी ते घेतात. कारण गावची अब्रू तीच आपली अब्रू याची जाणीव त्यांना असते. म्हणून स्वत:च्या कोठीतील धान्य गावक-यांना वाटतात. तसेच घरातील दागीने, देव्हा-यावरील देव तारणी-करांच्याकडे ठेवण्यास तयार होतात. पण गावक-यांना धान्य कमी पडू देत नाहीत. तात्यानी रोखण्याचा प्रयत्न करताच, "कुणाला दान करायचं ? पिढयान् पिढयाचं ऋण हे, ते फेडतोय मी. तुम्हाला हे कळायचं नाही. त्याला इनामदारच व्हायला हवं." [७](पृ. १८९) यावरून त्यांची दिलदारवृत्ती दिसून येते. अशा त-हेने गावच्या संकटाच्यावेळी आप्पासाहेब गावक-याना मदत करीत असतात. यावरूनही त्यांचे गावावरील प्रेम दिसून येते.

आप्पासाहेब इनामदार असले तरी आपल्या घरच्या मंडळीकडेही त्यांचे तेवढेच लक्ष आहे. आपली पत्नी नसताना रावबा, जयवंत या मुलांना कोणतीही कमतरता भासू देत नाहीत. उलट आपल्या घराण्याचे शिष्टाचार वेळो-वेळी त्यांना देतात. याकरिता रावबाला वाईट मार्गापासून परावृत्त करतात. तर जयवंताच्या शिक्षणाची काळजी घेतात. आपल्या सुनेवरही तितकेच प्रेम करतात. "... पोरी तू मनाला लावून घेऊ नको.... मी आहे तोवर काळजी करू नको." [८] (पृ.२१८) यावरून त्यांची आपल्या सुनेवरील माया दिसून येते. तसेच आपला नातू छोटा यशवंत याला अंगा-खांद्यावर खेळवतात. हे त्यांचे कुटुंब वत्सल गुण अनेक ठिकांनी दिसून येतात.

शेवटी गावावर दरोडा पडणार हे आप्पासाहेबांना कळताच, सर्व गावक-यांना वाडयावर बोलवून योग्य सूचना देतात आणि दरोडा परतावून लावतात. पण दरोडेखोरांची गोळी लागून त्यात आप्पासाहेब दगावतात. असे हे आप्पासाहेब गावच्या भल्यासाठी झटणारे. गावच्या प्रत्येक संकटाच्या-वेळी धावून जाणारे. घरातील मंडळी प्रमाणेच नोकर-चाकर व गावक-यांवर

प्रेम करणारे आणि शेवटी गावासाठी स्वत:चा प्राण देणारे. अशा विविध चांगल्या गुणांनी "आप्पासाहेब इनामदार" या पात्राचे व्यक्ति-चित्रण या कादंबरीत रेखाटले आहे.

"तात्या" :

ब्राह्मण वर्गाला खेड्यातील लोक कसे मानाचे स्थान देतात. याचे उत्तम उदाहरण म्हणजे, रणजित देसाई यांनी "माझा गाव" कादंबरीत चित्रित केलेली तात्या ब्राह्मणाची व्यक्तीरेखा होय.

आप्पासाहेबांच्या प्रमाणेच तात्यांचेही आपल्या गावावर प्रेम आहे. म्हणून कोल्हापूरहून येताच तसे ते आप्पासाहेबांना बोलूनही दाखवितात, "हे काय आप्पासाहेब ते दिवस कसे विसरतील ?" ..... आणि ठरवलं की जिथं आपलं घरदार आहे, शेतीवाडी आहे, जिथं आपलं वाडवडील गेले तिथंच आपलं उरलेलं आयुष्य घालवाव." [१](पृ.८). यावरून तात्यांना खरो-खरच आपल्या गावाबद्दल किती ओढ होती, हे दिसून येते. त्यामुळे सारा गाव त्यांच्याकडे ओढला गेला. कधी कुणी मुहूर्त पाहण्यासाठी त्यांना गळ घाली, तर कुणी सल्ल्यासाठी त्यांच्याकडे येई. यावरून खेड्यापाड्यातून पूर्वी अतिशय भोळ्या स्वभावाची माणसे राहात आणि गावातील लिहिता-वाचता येणाऱ्या ब्राह्मणावर त्यांचा मोठा विश्वास असे. सारे लोक त्यांना मान देत असत. हीच परंपरा रणजित देसाई यांनी प्रस्तुत कादंबरीतून दाखविलेली आहे. ब्राह्मण आणि ब्राह्मणोत्तर यांच्यातील संबंधाचे रणजित देसाई यांनी जे चित्रण केलेले आहे, ते काहीसे अपवादात्मक स्वरूपाचेच असल्याचे दिसते. देसाईचे एक स्वप्न असावे असे हे चित्रण आहे. त्यामुळे ह्या पात्राच्या चित्रणात स्वप्नरंजनच अधिक जाणवते.

तात्या आजारी माणसांची औषधपाणी देऊन सेवा करतात. त्या-करिता त्यांनी कधी महार-मांग म्हटलं नाही. म्हणजे तात्यांना जातीयता

मंजूर नाही हे स्पष्ट होते. तसे ते बोलूनही दाखवितात, "हे सारं जमणार नाही म्हणूनच मी ती जोखीम पत्करली नाही. पोटाला ना मूल ना बाळ. मग कशासाठी ही धडपड सारी ? हीच आपली माणसं समजतो आणि करतो सेवा त्यांची." [१०](पृ.२८). या त्यांच्या कार्यावरून गोरगरीबांना मदत करण्याची त्यांची वृत्ती दिसून येते.

आपले हे समाज सेवेचे कार्य करीत असताना, तात्या जसे जात-पात पाहात नाहीत. त्याचप्रमाणे काळवेळ याचेही भान ठेवीत नाहीत. एक वेळ काळू बेरडाच्या मुलाला औषध देण्यासाठी तात्या रात्रीचेच जातात. पण इकडे काकी, आप्पासाहेब, उमा, जयवंत काळजी करत असतात. हे तात्याना समजतातच, ".... उपकार कसले आलेत ? कुठल्यातरी जन्माचे देणेकरी ते ! त्याशिवाय का अशी माणसं मिळतात ? ही नाती त्या जन्माची नव्हेत बरं ? नाहीतर ते प्रत्यक्ष भावाला बोलता आलं नाही ते आप्पासाहेब बोलले नसते..." [११](पृ. ३७) यावरून तात्यांना प्रेमळ माणसेच कशी भेटत असतात हे स्पष्ट होते.

रावबा-हौस प्रकरणातून विठूचा खून होतो. मग गावकरी रावबाच बरबाईट करणार व त्यामुळे गाव अधिकच भडकणार हे तात्यांना माहित असते. म्हणून ते रावबाच्या सुरक्षिततेची काळजी घेतात. आणि आप्पासाहेबांना म्हणतात, "आप्पासाहेब काही नाती जोडून-जोडली जात नाहीत. कैक जन्माचा तो ऋणानुबंध असतो. हया रेशमाच्या गाठी आहेत. सोडतो म्हणून सुटत नाहीत." [१२] (पृ.११३) असं म्हणून आप्पासाहेबांच्याबद्दल आपुलकी दाखवितात.

गावात पटकीची साथ येते तेव्हा तात्यांचा जीव कासावीस होतो. मग तात्या गावच्या प्रेमापोटी औषधाची मात्रा देण्यासाठी अहोरात्र कष्ट घेतात आणि या साथीतून गावकऱ्यांना वाचवितात. तसेच दरोडेखोराच्या

प्रसंगावेळीही गावच्या संरक्षणासाठी झटत असतात आणि आप्पासाहेबांना म्हणतात, "..... नाही आप्पासाहेब, गाव जसं तुमचं आहे तसंच ते माझंही आहे. मला तरी कसं जाता येईल ? जे व्हायचं असेल ते आपल्या दोघांचे होईल." [१३](पृ.२३५) म्हणजे गावच्या प्रेमापोटी स्वत:च्या जीवाचीही पर्वा त्यांना नाही हे स्पष्ट होते आणि दरोडेखोर गावाला घेराव घालून सगळ्या वाटा अडवितात. पाहून तात्या मार्ग काढतात. होसूरच्या रामाच्या आईला औषध घायला पाहिजे असं रामोशाला खोटच सांगून बेळगावला पोलिस पार्टी आणावयास जातात. यावरून तात्या हुशार, युक्तीवादी आहेत. हे स्पष्ट होते. पण इकडे दरोडेखोर गावावर चाल करतात आणि त्यात आप्पासाहेबांचा मृत्यू होतो हे तात्यांना कळताच आपला हा आधार निघुन गेला म्हणून त्यांना अनावर दु:ख होते. अशातच काकीचांही आजार वाढत होता. त्यामुळे काकीही एक दिवस निघून जाते. मग तर तात्यांना आधिकच दु:ख होते. त्यांचा उरला-सरला आधारही नाहीसा होतो. म्हणून तात्याही सर्वांचा निरोप घेतात.

असे हे तात्या गावच्या भल्यासाठी झटणारे. जात-पात न मानता गोरगरीबांना मदत करणारे. गावच्या प्रत्येक संकटाच्यावेळी धावून येणारे. त्यासाठी अपमान सहन करणारे तात्या हे खरेखुरे समाज सेवक आहेत. हे त्यांच्या व्यक्तीमत्त्वातून दिसून येते.

"उमा":

"उमा"च्या रूपाने "माझा गाव" कादंबरीमध्ये एका आदर्श स्त्रीचे चित्रण आले आहे. आंदेवाडीकर इनामदार यशवंतराव यांची ही मुलगी. आप्पासाहेबांच्या घरी सून म्हणून येते आणि सरकारी भोसले घराण्याचा सर्व कारभार सासुविना अंगावर पेलते. आपल्या नव-याप्रमाणेच ती सास-यावर दिरावर, वाड्यातील नोकर-चाकर, तात्या-काकी व गावावर तितक्याच

मायेने वागते. आपले सासरे व वडील यांच्यात लग्नाच्यावेळी किरकोळ भांडण होते. त्यामुळे उमाला आपले माहेर कायमचे मुकावे लागते. तसेच रावबाच्या वाईट वागण्यामुळे उमाला त्रास होत असतो आणि शेवटी आप्पासाहेब, तात्या, काकी ही सोडून जातात. म्हणून उमाला दुःख होते. अशा विविध रूपात उमाचे व्यक्तिचित्र या कादंबरीत आले आहे.

इनामदार घराण्यात आपले स्थान आणि मर्यादा याची तिला पुरी जाणीव आहे. म्हणूनच नवरात्रच्या वेळी लागणारी साहित्याची यादी आपण स्वतः करून कारभा-याकडे देते. आपल्या नव-याचे पडणारे प्रत्येक पाऊल कसे आहेत, त्याचे परिणाम काय होणार याची तिला पुरती जाणीव आहे. रावबाचा हौसाशी असणारा अनैतिक संबंध. यामुळे तिची कुचंबणा होत होती. पण ही सारी कुचंबणा ती सहन करते. रावबाच्या या वागण्यामुळे आपल्या घराण्याची अब्रू जात आहे याचीही तिला जाणीव आहे. त्यामुळे आप्पासाहेबांना व तात्याना कोणता ताप होतो. याचीही तिला पूर्ण जाणीव आहे. यामुळे तिला अधिकच दुःखाच्या यातना सहन कराव्या लागतात. त्या तिच्या यातना स्पष्ट करताना आप्पासाहेब म्हणतात, "हं : । पोरी, तू सुखी ? .... जबाबदा-या स्वीकारल्यास, पण त्या स्वीकारीत असताना हक्काच्या माणसाला जवळून ठेवायचं मात्र त्या धांदलीत संपूर्ण विसरलीस।"[१४](पृ.७९) यावरून उमाच्या दुःखाची कल्पना येते.

उमा दिवसात असताना तिचे मामासाहेब काळजी घेतात. सासूची, माहेरची उणीव भासू देत नाहीत. याचीही तिला जाणीव असल्यामुळे आपल्या सास-यावर ती संतुष्ट आहे. पण बारस्याला आपल्या कोणी आले नाही म्हणून दुःखी होते आणि आहेर घेऊन आलेल्या महादूकडे आबा, आई कशी आहेत, याची चौकशी करते. यावरून स्त्रीया आपल्या माहेरच्या

माणसाना पाहण्यास किती आतूर झालेल्या असतात. याचे चित्रण लेखकाने उमाच्या व्यक्तिचित्रणातून केले आहे.

उमा जयवंताला आईचे प्रेम देते. त्याचे सर्व लाड, हट्ट पुरविते. त्याकरिता त्याला कधी उपहासाने तर कधी लाडाणे बोलते. खाण्यापिण्यापासून शाळेत जाण्यापर्यंतच्या त्याच्या सर्व गोष्टींची वेळोवेळी काळजी करते. आणि जयवंताला आपल्या घराण्याचे योग्य शिष्टाचार शिकविते. तसेच जयवंताने शाळा शिकून, आपल्या घराण्याचे नाव राखाव म्हणून त्याच्या शाळेची वेळोवेळी चौकशी करते. यावरून उमाचे खरोखर आपल्या दिरावरील प्रेम निष्ठा दिसून येते. तसेच गावक-यांवरही तिचे तितकेच प्रेम आहे. म्हणून गावासाठी तारणीकरांच देणं देण्यासाठी आपल दागीनेसुध्दा द्यायला मागपुढे पहात नाही. यावरून तिचे गावावरील प्रेम दिसून येते. तसेच गावावर दरोडा येणार म्हणून आप्पासाहेब उमाला संरक्षणासाठी जयवंत, यशवंत याना घेऊन बेळगावला जाण्यास सांगतात. पण असल्या बिकट प्रसंगी आपण सर्वजण एकत्र असावे या विचाराने ती बेळगावला जाण्यास तयार होत नाही. पण दरोड्यात आप्पासाहेब मारले जातात. यावर उमाला अतिशय दुःख होते आणि थोड्याच दिवसात तात्या-काकीही जातात. मग तर तिच्या दुःखात अधिकच भर पडते. अशी ही उमा स्वतः दुःख भोगून दुस-याना आनंद देणारी दिसून येते. तसेच प्रेमळ, ज्ञानी, पतिव्रता, सत्वशील अशा विविध रूपात उमाची व्यक्तिरेखा लेखकांने रेखाटली आहे.

"रावबा" :

कादंबरीत "रावबा" हा आप्पासाहेबांचा थोरला मुलगा, व उमाचा पती म्हणून आला आहे. लहानपणी वडीलांच्या चांगल्या विचारांचा प्रभाव त्याच्यावर पडला असला तरी, नंतरच्या काळात उन्मत्त वर्तन करून

आपल्या सरकारी घराण्यावर अंकुश कसा ठेवतो. याचे चित्रण त्याच्या व्यक्तीमत्त्वातून दिसून येते.

रावबाची आणि हौसाची भेट जत्रेत होते. तेव्हापासून हौसा त्याच्या मनात बसते. मग तो तिला वेळोवेळी भेटत असतो. मळ्यात कामालाही यायला सांगतो. या सर्व गोष्टींची माहिती उमाला होते. त्यामुळे घरात तिची कुचंबणा होते. आप्पासाहेबांनाही या रावबाच्या वर्तणाचा मनस्वी ताप होतो. गावातही याचा बोलबाला होत असतो. तरी त्याची रावबाला यत्किंचीतही फिकीर नसते आणि याकरिता हौसाला तिच्या नवऱ्याने मारले. हे कळताच तो देवजीला म्हणतो, "सांग जा त्या विठूला, बायकोला चांगलेपणानं वागवून घ्यायचं असलं तर राहा म्हणावं गावात." [१५](पृ.७२) आणि घरातून तिला बाहेर काढली म्हणून रामजीच्या घरात तिला ठेवतो. पण आपल्या अब्रुची काळजी करत नाही. घरात शुध्द, सात्त्विक पत्नी असूनही तो बाहेरख्याली बनतो. वडीलांचा चाबकाने मार खातो. पण तो आपले वर्तन बदलत नाही. यावरून रावबा उन्मत्त वृत्तीचा असल्याचे दिसते.

रावबाच्या या उन्मत्त वर्तनाचा राग विठूला येतो आणि सोनं लुटण्याच्या दिवशी शिकारीला गेलेल्या रावबाला मारावयास विठू जातो. पण विठूचाच रावबाच्या घोड्यांच्या टापाखाली चिरडून खून होतो. मग तर सारा गाव रावबा विरुध्द पेटून उठतो. विठूच तेराव व्हायच्या आत रावबाला मारायच ठरवतात. शेवटी रावबाला अटक होते. पण रावबाच्या या भानगडीचे परिणाम आप्पासाहेब, तात्या यांना भोगावे लागतात. कोर्ट कचेऱ्या खेळाव्या लागतात. रावबाच्या या वागण्यामुळेच गावकऱ्यात व आप्पासाहेब यांच्यात संघर्ष निर्माण होतो. यामुळे आप्पासाहेब, तात्या यांना दुःख होते. कारण आजपर्यंत गावात अशा प्रकारे कोणताही संघर्ष न उद्भवल्यामुळे, गाव एकसंघ जीवन जगत होता. पण रावबाच्या या वाईट

वागण्यामुळे सर्वांनाच कसा त्रास होतो. याचे चित्रण लेखकाने रावबाच्या व्यक्तिचित्रणातून केले आहे. त्यामुळे रावबाचे हे वागणे अस्वाभाविक वाटते.

पण पुढे रावबाची निर्दोष सुटका होते आणि गाव पूर्ववत शांत होतो. रावबाही आता झाल्या चुकीबद्दल पश्चाताप करतो आणि पत्नीच्या सुखा-मध्ये विलीन होतो. पूर्ववत संसारात मग्न होतो आणि आप्पासाहेब, तात्या यांच्या मृत्यूनंर गावाची जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेतो. अशा त-हेने सुरवातीला तरुणपणामुळे, उन्मतपणामुळे अविचारी वागला असला तरी, नंतरच्या काळात आपल्या जीवनाचे भवितव्य ओळखून वळणावर येतो आणि आप्पासाहेबांच्या प्रमाणेच गावच्या भल्यासाठी कामाला लागतो. अशा त-हेने लेखकाने रावबाचे व्यक्तिचित्रणातून सुरवातीस उन्मत्तपणा दाखविला आहे व नंतर रावबा वळणावर आलेला दाखविला आहे. आणि खेडेगावातील श्रीमंत लोकांची मुले कशी वागतात याचा प्रत्यय रावबाच्या रुपाने लेखकाने या कादंबरीत करुन दिला आहे.

"हौसा":

वाड्याचा मोठा आधार वाटणा-या बजाबाची सून म्हणजे ही हौसा. जशी ती विठूची बायको म्हणून आपणास या कादंबरीत दिसून येते, तशीच रावबाची रखेली म्हणूनही दिसून येते आणि तिच्या हया वागण्यामुळेच गावात दुफळी निर्माण होते.

या हौसाची आणि रावबाची भेट जत्रेत होते. तेंव्हापासून ती रावबाशी संबंध ठेवते. मग ती रावबाच्या सांगण्यावरुन त्याला वेळोवेळी भेटायला जात असते. तसेच आपले हे संबंध अधिक जवळ यावेत म्हणून ती रावबाच्या मळ्यातही कामाला जात असते. यावरुन तिचे रावबाशी असलेले

प्रेम संबंध स्पष्ट दिसतात. गावात हौसाच्या या वागण्याचा बोलबाला होतो. पण याची तिला फिकीर नसते. अब्रूची चिंता नसते. हे तिचे वागणे बगाबा, विठू यांना समजते आणि त्यांना गावात तोंड दाखवायला जागा राहात नाही. म्हणून ते तिला समजावण्याचा प्रयत्न करतात. तरी सुध्दा हौसा रावबावरील प्रेमापोटी स्वत:च्या नव-याची सास-याची फिकीर करीत नाही. असे हे हौसाचे वाईट वागणे दिवसे-दिवस वाढतच असते. मग मात्र विठूचा राग अनावर होतो. म्हणून विठू तिला मारहाण करुन घरातून बाहेर काढतो. मग हौसा तशीच येवून सारी घडली हकीगत रावबाला येवून सांगते. म्हणून रावबा तिला रामजींच्या घरी ठेवतो. पण ती रावबापासून दूर राहू शकत नाही यावरुन तिचे रावबावरील प्रेम दिसून येते.

हौसाच्या या वागण्यामुळे विठू हकडे डोक्यात राख घालून फेतो. दारु पितो व एक दिवस रावबाला मारावयास जातो. पण त्यात विठूचाच अंत होतो. त्यामुळे सारा गाव आप्पासाहेबांच्या विरोधात जातो आणि गावात दुफळी निर्माण होते. याकरीता गावक-यांना आणि आप्पासाहेबांना एकमेका-विरुध्द कोर्ट कचे-या खेळाव्या लागत. हे सर्व हौसाच्या वागण्यामुळे घडते.

अशा त-हेने खेडेगावातील परिस्थितीने गांजलेली स्त्री आपल्या गावातील श्रीमंत मुलाच्या नादी लागते आणि आपला जीवितार्थ कसा चालविते याचे चित्रण हौसाच्या रुपाने लेखकाने केले आहे. पण हौसाचे हे वर्तन खेडेगावातील रितीरिवाजांना धरुन नाही. त्यामुळे तिचे हे वर्तन अनैतिक वाटते. याचाही प्रत्यय लेखकाने हौसाच्या चित्रणातून दाखविला आहे.

"जयवंत":

"जयवंत" हा आप्पासाहेबांचा लहान मुलगा. लहानपणीच आई वारल्यामुळे आप्पासाहेब जयवंतचे पालन-पोषण करतात. [illegible] जयवंत

आईविना पोरका मुलगा असला तरी, त्याची वहिनी उमा त्याला आईचे प्रेम देते. जयवंतही आपल्या वहिनीला परकी लेखीत नाही. त्यामुळे आपले हट्ट, लाड वहिनीकडून पूर्ण करून घेतो. एकदा जयवंत वहिनीला मिष्कील-पणे म्हणतो, "वहिनी रस्सा चांगला नाही झाला.... आणि चपात्या पण तुटत नाहीत." त्यावर वहिनी म्हणते, "तुटतील हं ! तुमचं लग्न झालं की, बघु ती नवी सुगरण चपात्या कशी करते ती."[१६] (पृ.८३) तसेच "मी शाळा जानार नाही" असे जयवंत म्हणताच त्याची वहिनी म्हणते, "मग काय गुरं राखणार ?" त्यावर जयवंत म्हणतो, "होय, चार म्हशी घेणार आहे तू शेणा काढणार नव्हे ?" मध्येच सारजा तोंड खुपसते, "वैनी साबच कशाला पायजेत शेन काढायला ? तुम्हास्नीच एक बायको करूया की !" तू गप्प बस, सारजा... सारजा... कुठली !"[१७] (पृ.१५०) तसेच, "मी बसनार घोडयावर !", "तर तर ! म्हणे घोडयावर बसनार." तुला गाढव घेऊ या !"[१८] (पृ.२२९) असे जयवंत छोटया यशवंतला चिडवितो. यावरून जयवंताचा मिष्किल विनोदी स्वभाव दिसून येतो. यातूनच त्याचे व्यक्तिमत्त्व साकार होते.

जयवंत जसा खेळकर, हट्टी आहे. तसाच शिष्टाचार आणि प्रेमळही आहे. म्हणूनच आपल्या वडीलांकडून चांगल्या गोष्टींचे धडे घेतो. याकरिता आप्पासाहेबांच्या सांगण्यावरून तात्या-काकींच्याकडे जाऊन शिक्षण घेतो. आणि आपल्या प्रेमळ स्वभावाने त्यांना जिंकतो. तसेच आपल्या दादा-वहिनीची काळजी घेतो आणि त्यांनाही आपल्या प्रेमळ स्वभावाने जिंकतो. यावरून त्याचा प्रेमळपणा दिसून येतो आणि शेवटी आप्पासाहेब, तात्या-काकी जातात म्हणून त्याला अनावर दुःख होते. अशा प्रकारे रणजित देसाई यांनी "जयवंतच्या रूपाने किशोरावस्थेतील लहान मुलांचे चित्रण केले आहे. त्यामुळे लहान मुलाच्या ठिकांनी जे गुणधर्म असतात याचा प्रत्यय जयवंतच्या व्यक्तिमत्त्वातून दिसून येतो.

## "माझा गाव": सामाजिक चित्रण -

"माझा गाव" मधील माणसं एकटी-एकटी जगताना दिसत नाहीत. म्हणून ती आप्पासाहेबांच्या वाड्यावर काही ना काही कामानिमित्य येत असतात. तसेच संकटकाळी, वेळप्रसंगी या गावातील लोक एकमेकांना मदत करतात. संपूर्ण गाव हे एक कुटुंबच आहे असे वाटते. एकूण समाज गाव कसे जगत, यातूनच या कादंबरीतील सामाजिक चित्रण दिसून येते.

मोहोळ्याला जत्रेला जाण्यासाठी आप्पासाहेब गावक-याना तयारी करावयास सांगताता आणि बैलगाड्यातून सर्वजन जत्रेला जातात. जत्रेच्या ठिकाणी अनेक गावची माणस आलेली असतात. आप्पासाहेब आपल्या ओळखीच्या माणसांची चौकशी करीत होते. आणि जत्रेचा सामुदायिक आनंद लुटीत होते. बकरी बळी देण्यासाठी सगळे लोक देवळाजवळ जमा झाले होते. आप्पासाहेबांच बकर बळी पडल्यावर सर्वांची बकरी बळी पडतात. तसेच जत्रेत कुस्तीचा फड असतो. गावक-या बरोबर आप्पासाहेबही कुस्त्या पाहातात व आपल्या गावच्या विठूने कुस्ती मारली म्हणून त्याला शाब्बा-सकी देतात. यातून आप्पासाहेबांना आपल्या गावच्या पैलवानाबद्दल असणारा अभिमान दिसून येतो. तसेच जत्रेमध्ये निरनिराळी दुकाने असतात. त्याचा लाभ गावकरी घेत असतात आणि जत्रा संपताच आपआपल्या गावी परत येतात. अशा त-हेने जत्रेच्या निमित्ताने खेडेगावातील लोक सामुदायिकरित्या हा कार्यक्रम कसा पार पाडतात याचे चित्रण या कादंबरीत आले आहे.

नवरात्रीच्या सणाच्यावेळी खेडेगावातील लोक आगळा-वेगळा आनंद लुटीत असतात. याचेही चित्रण "माझा गाव" कादंबरीमध्ये आले आहे. या सणात रीतीप्रमाणे वाड्याची सजावट करण्यात येते. याशिवाय आप्पासाहेब, उमा, तात्या, कारभारी गोविंदा, सरस्वा, गावातील कुंभार, सुवासिनी बायका आपआपल्या कामात मग्न असतात. वाड्यात गुरुचरित्र ग्रंथ वाचण्यात

येत होता. याकरिता गावकरी नियमान वाड्यात येत होते. तसेच सोने लुटण्याच्या दिवशी शिकारीला जाणे हा खेडेगावातील रीवाज आहे. त्याप्रमाणे रावबा, देवजी, रामजी ही मंडळी शिकारीला जातात. पण रावबा शिकारीहून लवकर येत नाही. म्हणून सारं गाव सोन लुटण्यासाठी वाट बघत बसतो. कारण रावबाच्या हाती सोनं लुटण्याचा मान असतो. पण रावबा लवकर येत नाही. म्हणून जयवंताच्या हाती सोनं लुटल जात. मग सारे गावकरी सोनं लुटतात. अशा पध्दतीने सणा-सुधीच्या वेळी ग्रामीण भागातील लोक एकत्र येऊन हे उत्सव कोणत्या पध्दतीने पार पाडतात. याचे चित्रण या कादंबरीत केले आहे.

गावच्या विरूध्द एखादी गोष्ट घडली. तर सारा गाव एक होऊन त्या विरूध्द होतो. त्याप्रमाणे हौसा-रावबा प्रकरणापायी गावात चर्चा होते. विठूचा खून रावबाकडून होताच, सारा गाव एक होऊन या गोष्टीची विचारपूस करतो. यातून गावात दुफळी निर्माण होते. याकरिता गावकऱ्याना कोर्ट-कचेऱ्या खेळाव्या लागतात. अशा प्रकारे गावातील संघर्षाचे वातावरण चित्रित केले आहे.

पेरणीच्या दिवसात सारा गाव कामाला लागतो. याकरिता शेतकरी लोक सुताराकडून आपल्याला लागणारे शेतीचे साहित्याची दुरूस्ती करून घेतात आणि एकान पेरणी केली की, त्या पाठोपाठ सारा गाव पेरणी करू लागतो. यातच पाऊस सुरू झाल्यावर साऱ्यांची धांदल उडते. त्यामुळे सारा गाव काळजीत कसा पडतो. याचेही चित्रण आले आहे.

खेडेगावातील लोक एखाद्या समारंभाच्यावेळी एकत्र येवून तो समारंभ कसा पार पाडतात, याचेही चित्रण आले आहे. आप्पासाहेब आपल्या नातवाचे बारसे मोठ्या थाटामाटात घालतात. या करीता पै-पाहुणे गोळा होत होते. म्हणून आप्पासाहेब, जयवंत, तात्या कामात मग्न होते. गावकरी

बारशाचे भोजन आनंदाने करत होते. आप्पासाहेब स्वत: लोकांना वाटत होते. येणा-या-जाणा-या लोकांचा आनंदाने स्वीकार करीत होते. याद्वारेही सामाजिकतेचे चित्रण आले आहे.

आनंदाच्या प्रसंगी हे लोक जसे एकत्र येतात. तसेच संकटाच्या, दु:खाच्या प्रसंगीही हे लोक एकत्र येत असतात. पटकीच्या साथीत गावातील माणस दगावत असतात. त्याकरिता आप्पासाहेब, तात्या औषध पाण्याची व्यवस्था करतात. तसेच गावातील तरुण मुले येजन मयतांची विल्हेवाट लावतात. तसेच गावावर ओला दुष्काळ पडतो. तेव्हा गावक-यांना खायला अन्न नसत. याची चौकशी आप्पासाहेब करतात. आणि आपल्या घरातील धान्य गावक-याना वाटतात. तसेच गावावर दरोडा येणार म्हटल्यावर आप्पासाहेब गावक-याना वाड्यात बोलवुन घेतात आणि दरोडा परतावून लावण्यासाठी योग्य सुचना देतात. पण त्यात आप्पासाहेबांचा मृत्यू होतो. म्हणून सारे गावकरी दु:खाने कळवळतात. तसेच तात्या-काकी यांच्या मृत्यूनेही गावकरी दु:खी होतात. म्हणजे या गावचे लोक संकटकाली, दु:खाच्यावेळी एकमेकाना कसे मदत करतात याचे चित्रण आले आहे. एकूण इनामदारी वतन असलेल्या गावामध्ये जुनी समाज परंपरा असते. या गावातील इनामदारांचे गावावर वर्चस्व असते. गावातील लोकही या इनामदार घराण्यावर अवलंबून असतात. गावकरीही गावच्या हितासाठी एकजुटीनं राहात असतात. याकरीता आप्पासाहेब, तात्या, आप्पासाहेबांच्या घरातील नोकर-चाकर, गावातील गरीब लोक, शेतकरी कुळे, बलुतेदार, या सर्वांच्या परस्पर सहकार्याने या गावचा कारभार चाललेला असतो. गावातील देवधर्म, जत्रा, जत्रेतील कुस्त्या, सण-उत्सव यावेळचे परंपरागत पध्दतीचे मान-पान गावातील लोक संकटकाळी, वेळप्रसंगी, आनंदाच्यावेळी एकमेकांना कशी मदत करतात. एकजुटीनं कशी राहतात यातूनच "माझा गाव" कादंबरीमध्ये सामाजिकतेचे चित्रण दिसून येते.

चित्रणविषय केलेल्या प्रदेशातील बोलीचा संवादासाठी उपयोग करणे. हे प्रादेशिक कादंबरीचे एक महत्त्वाचे वैशिष्टये असते. "माझा गाव" कादंबरीमध्येही हे वैशिष्टये दिसून येते. "रणजित देसाई हे मुळात सरदार-पुत्र. राजघराण्याशी त्यांचा संबंध आल्यामुळे तेथील व्यक्तींच्या क्रियाप्रति-क्रिया, बोलणी, संभाषणे, वर्तन ह्या गोष्टी प्रत्यक्ष अनुभवल्या आहेत." [११] त्यामुळे या कादंबरीत त्याच पध्दतीच्या भाषेचा उपयोग केला आहे.

## वाक्प्रचारांचा वापर:

विचाराचे काहूर माजणे, डोळा लागणे, भिड चेपणे, तोंडाचा चंबू करणे, गहिवर येणे, मनाचा हिय्या करणे, जीव पोखरणे, गळ्याशी येणे, त्राही भागवान करुन सोडणे, टाकूण बोलणे, विरंगुळा वाटणे, पाणी दाखविणे, हातीची टाल करणे, चंग बांधणे, जीव कासाविस होणे, मनाचा हिय्या करणे, दाताच्या कन्या करणे, जीव मेटाकुटीला येणे, अंगाची लाही-लाही होणे, नाकाला मिरच्या झोंबणे, श्वास रोखून बघणे, कासाविस होणे, मनावर दगड ठेऊन उठणे, मनाचे बांध फुटणे, इत्यादी वाक्प्रचारांचा वापर करुन कादंबरीतील भाषेचे सौंदर्य वाढविले आहे.

## म्हणींचा वापर:

पटकेत तोळा तर पटकत राळा (पृ.१४), वादीला कार आणि धरणीला भार (पृ.३३), जिकडे सुटा तिकडे मुलूख थोडा (पृ.३७), म्हणतात ना भटाला दिली....." (पृ.६५), शहाण्याला शब्दाचा आणि ......" (पृ.८४), शिर सलामत तो पगडी पचास." (पृ.१७५) अशा त-हेने "माझा गाव" कादंबरीमध्ये म्हणींचा वापर लेखकाने केला आहे.

"माझा गाव" मधील भाषेची धाटणी :

"अवंदा पीक-पानी झोकात आलयं." (पृ. १३)
"येऊ देत! येऊ देत !! देवाची मायाच आहे." (पृ. ४२).
"अस्सं अस्स, पोरानं नांव केलं तुझ्या." (पृ.५८)
"जाऊ दे ! पोटच्या पोराला जो विश्वास वाटला नाही तो तू तरी कसा धरावास ...?" (पृ.७८)
"माजं सोन लुटल धनी." (पृ.९६)
"थांब पोरी, कातरवेळी आलीस, कुंकू लावून जा." (पृ. ११२)
"नाही आबा, होय.... होय.... नाही.... "(पृ. १६३)
"देव कोपत नसतो मल्हारी." तात्या म्हणाले, परीक्षा घेत असतो."(पृ.१७८)
"या पांढरीपुढं चोर, चांडाळास्नी मारून मारून बाळ-गोपाळास्नी आनंद कर ...." (पृ. १७९)

अशा प्रकारे लेखकाने भाषेची धाटणी वापरून कादंबरीची गुणवत्ता वाढविली आहे.

"माझा गाव" मधील लोकांच्या शिव्या देण्याच्या पद्धती:

"लाज नाही वाटत वाड्याची पायरी चढायला ?" (पृ. १४)
"मरेना इनामदार ! तुम्हाला काय सोयर सुतक ? हरामखोर लेकाचे."(पृ.१४)
"माजुरी लेकाचे! गोविंदा, ते पैसे मोजून घे. एक पैही सूट देऊ नकोस हरामखोराला ....." (पृ. १५),
"आता काय उपडी पडून शेण खातात का काय ? ...नादान पोरे!"(पृ.[illegible])
"हरामखोरा ! ज्याच्या अन्नावर वाढलास त्येला चावतोस! (पृ. ७४),
"च्या...पला, खोटं बोलतोस....!" (पृ. ९७)
"कुणाची माय व्यालीय .... ?" (पृ. १०४),
"कुठलं आलं देव! त्या रांडपायीच झालं हे सगळ." (पृ. १०६)

"भोसडिच्या! लाथ घालीन बोलशील तर!" (पृ. १८८),
"एवढं झाल्यावर कुणाची माय व्यालीय गावावर यायला." (पृ. २४२),
"च्यायला! लपले भडवे....." (पृ. २५२),
"मूर्खा, मरायचं काय ?" (पृ. २५३)

यातून "माझा गाव" मधील लोकांच्या शिव्या देण्याच्या पध्दती, स्वभाव, वागणे ही वैशिष्ट्ये दिसून येतात.

"माझा गाव" मधील शब्दांची वैशिष्ट्ये :

भलती उसाबर, तेच ब्येस, निवत, वसाड, डोंबल, माजं, हकड, हयव, फिरवल्यान, बसवल्यान्, जडावलंय, बसकण, धूगाळ, टसटसा, मोप, गाळी दीत, कट्टयात, गदाळा, येळेस, झिरगीच्या, भडुशा, आदमास, नेणती, धावं दणाणल, वळकांड, सासनकाठी, आरगल, देऊस नाय म्या, साटनं, मार्गींदी. अशा कितीतरी ग्रामीण बोलीतील शब्दाचा वापर केला आहे.

"माझा गाव" कादंबरीमधील उपमांचा वापर:

गळा कापला कोणी तुमचा, तरी भोपळा कापला म्हणणार तुम्ही. (पृ. ३१), मधाचं मोहोळ उठावं तसा जत्रेचा अखंड नाद कानावर पडत होता. (पृ.४६), रताळ्यासारखं मास त्याच्या अंगावर थपथपलं होतं. (पृ. ५७). त्याच्या कांबीसारख्या ताठ अंगयष्टीवर सर्वांचं लक्ष खिळलं होतं. (पृ.५७). अरं पिंडीवरच्या विंचवाला मारायला गेलं तर पिंडीला धक्का लागल न्हंव? (पृ. ७४). आप्पासाहेब पिंज-यात कोंडलेल्या वाघाप्रमाणे संतापले होते. (पृ.१११). आप्पासाहेब शिंगात किडे पडलेल्या बैलासारखे तळमळत असतील... ...(पृ. १४०). एखाद्या प्रमत्त विवस्त्र स्त्रीनं घाईघाईनं पायाशी पडलेले वस्त्र नेसू लागावं, तशी नदी आपलं पसरलेलं तांबड वस्त्र सावरीत होती. (पृ.१८५). पण जमीन विकशील तर उपाशी मरशील. आईला विकून

दूध कुठलं पिशील तू ? (पृ. १९७).

अशा प्रकारच्या उपमांचा समर्पक वापर करून भाषेला अधिक उठावपणा दिला आहे.

"माझा गाव" मधील विनोद निर्मिती:

"इश्श.! नावानं कसलं हाक मारता. (पृ. २४).

"जे दोघ उठले ते ठो बोंबलत सुटले. एक एकीकडे तर एक एकीकडं." (पृ.५४)

"वहिनी रस्सा चांगला नाही झाला." ....आणि चपात्या पण तुटत नाहीत." जयवंत हसू दाबीत म्हणाला. (पृ. ८३)

"तैनीसाबन कशास पायजेल शेन काढायला ? तुम्हास्नीच एक बायको करत्या की.!" (पृ.१५०).

"कशी असलीस ?" ...... अग आज रविवार.! " (पृ. १५५).

"तर तर.! पुढीचा काय ? चिलीम ओढीत होतास की नाही ? ती बघ चिलीम." (पृ. १५७).

"कालटा म्हनतीस ? सांगू आजोबांना ? (पृ. २२५).

"तुला गाढव घेऊ या .! " (पृ. २२९)

"तुझे कान मोठे का माझे ?" "माझे" मग झालं तर.! तू गाढव.!" (पृ.२३)

अशा प्रकारे "माझा गाव" कादंबरीमध्ये विनोद निर्मिती दिसून येते.

एकूण कादंबरीमध्ये भाषाशैलीच्या विविध गुणांचा, रूपांचा, उपमा-अलंकार, म्हणी, वाक्प्रचार, शिव्या, विनोद इत्यादींचा वापर करून कादंबरीची गुणवत्ता वाढवीली आहे.

"माझा गाव" निवेदन :

सध्या ग्रामीण लेखक संवादासाठी ग्रामीण भाषा व निवेदनासाठी नागर भाषा वापरत असतात. त्याचप्रमाणे "रणजित देसाई" यांनी "माझा

गाव" कादंबरीमध्ये संवादासाठी ग्रामीण भाषा व निवेदनासाठी नागर भाषेचाच वापर केला आहे. अशा पध्दतीने वापरलेली भाषा एकूण कादंबरीच्या आशयाशी सुसंगत अशीच आहे. तसेच कादंबरीतील ग्रामीण जीवनाचे आकलन करुन देण्यास ती भाषा पुरेशी पडते.

"माझा गाव" कादंबरीच्या प्रास्ताविक प्रकरणात आणि शेवटच्या प्रकरणात प्रथम पुरुषी निवेदन आलेले आहे आणि मधल्या एकवीस प्रकरणांत तृतीय पुरुषी निवेदन आलेले आहे. संबंध कादंबरी वाचूनही प्रथम-पुरुषी निवेदन आरंभी आणि शेवटी का आले याचे प्रयोजन उमगत नाही. या संदर्भात गो.मा. पवार यांचे मत विचारात घेणे आवश्यक आहे. "तृतीय पुरुषी निवेदन अजिबात टाळावयाचे व पात्रालाच आत्मनिवेदन करु द्यावयाचे याचा परिणाम चित्रणक्षेत्रावरती व आशयावरती होतो." [२०] पण रणजित देसाई यांनी वाचकाच्या मनात कादंबरी सलग उभी राहण्यासाठी, प्रथम-पुरुषी निवेदन आरंभी आणि शेवटी वापरलेले आहे. कादंबरीच्या आरंभी आणि अखेरी घातलेल्या दोन्ही प्रकरणाचा भावनिक सूर एक आहे. त्यातील मजकुरही एकमेकांशी बराचसा जुळता आहे. एवढेच काय शेवटचा मजकूर वाचताना, त्यातील "सूर" पकडताना आपणास वाटते की, हे आरंभी आपण वाचले आहे. असे वाटल्याने संबंध कादंबरीच्या कादंबरी मनात सलग पुन्हा एकदा विस्ताराने उभी राहते. आपण कोठून कुठवर आलो, याची जाणीव होते. ही योजना ठीकच आहे. म्हणूनच "रणजित देसाई" यांनी या कादंबरीच्या निवेदनात फरक केला आहे.

सारांश:

"माझा गाव" कादंबरी मध्ये स्वातंत्र्यपूर्व काळातील जुने खेडेगाव रणजित देसाई यांनी चित्रित केले आहे. या गावात असणारा इनामदार,

त्यांचा गावावर असणारा वचक, तसेच गावातील ब्राह्मण वर्ग त्यांची समाजसेवी वृत्ती, यांच्यावर गावकऱ्यांचा असणारा विश्वास, गावकऱ्यांची पारंपरिक वृत्ती, संकटकाळी एकमेकाना मदत करण्याची वृत्ती आणि शेवटी आप्पासाहेब, तात्या-काकी यांच्या मृत्यूमुळे सर्व गावाला होणारे दु:ख या चित्रणाद्वारे "माझा गाव" कादंबरीचे कथानक साकार झाले आहे.

जुन्या खेड्यातील माणूस स्वत:ला समाजाशी कसा वाहून घेतो, हा माणूस कसा होता, प्रत्येक माणसाचा एकमेकाशी कसा संबंध असतो, वेळ-प्रसंगी खेड्यातील माणसे एकमेकांना कशी मदत करतात, म्हणजे गाव कसे एकसंध जीवन जगत, यातूनच या कादंबरीचे आशयसूत्र उभे राहीले आहे.

या कादंबरीतील व्यक्तिचित्रणे ही कथानकाला पूरक अशी आहेत. कादंबरीतील महत्त्वाची व्यक्तीरेखा "आप्पासाहेब इनामदार" यांची आहे. संपूर्ण कादंबरी या व्यक्तीरेखेभोवती फिरताना दिसते. हे इनामदार प्रेमळ, सहनशील तसेच प्रसंगी रागीट आणि तापट अशा विविध रूपात दिसतात. तसेच तात्यांच्या व्यक्तीरेखेतून एक समाजसेवक उभा केला आहे. त्यामुळे गावकरी ही तात्याना फार मान देत असतात. हे तात्यांच्या व्यक्तिचित्रणातून दिसून येते. उमाच्या रूपाने सत्शील, पतिव्रता, सासऱ्याना सांभाळून घेणारी अशी भारतीय संस्कृतीतील आदर्श स्त्रीरेखा रेखाटली आहे. रावबा तरूण-पनात वाईट वागतो. त्यामुळे त्याचे वर्तन उन्मत्त वाटते. तर जयवंत या लहान मुलाच्या व्यक्तिचित्रणामुळे कादंबरीतील वातावरण खेळकर झाले आहे. तसेच हौसा, काकी, बजाबा या व्यक्तीरेखा त्या - त्या घटना प्रसंगानुसार आल्या आहेत.

"माझा गाव" मधील माणस एकटी-एकटी जगताना दिसत नाहीत. संकटकाळी, वेळप्रसंगी या गावातील माणसे एकमेकांना मदत कशी करतात. आप्पासाहेब, आप्पासाहेबांच्या घरातील नोकर-चाकर, गावातील गरीब

लोक, शेतकरी कुळे, ब्राह्मण यांच्या सहकार्याने गावचा कारभार चाललेला असतो. गावातील देवधर्म, जत्रा, सण-उत्सव यावेळचे मान-पान या सर्वांतून या कादंबरीतील सामाजिक चित्रण दिसून येते.

कादंबरीमध्ये भाषाशैलीच्या विविध गुणांचा, रूपांचा, उपमा-अलंकार, म्हणी-वाक्प्रचार, शिव्या-विनोद इत्यादींचा वापर करून कादंबरीची गुणवत्ता वाढविली आहे.

वाचकाच्या मनात कादंबरी सलग उभी राहण्यासाठी कादंबरीच्या प्रास्ताविक प्रकरणात व शेवटच्या प्रकरणात प्रथम पुरुषी निवेदन आले आहे. आणि मधल्या एकवीस प्रकरणात तृतीय पुरुषी निवेदन आले आहे. अशा-त-हेने आरंभी आणि शेवटी प्रथम पुरुषी निवेदन आल्यामुळे वाचकाच्या मनात कादंबरी पुन्हा सलग उभी राहते. हे या कादंबरीतील निवेदनाचे वैशिष्ट्य होय.

.......

प्रकरण तिसरे

## संदर्भ


१) रणजित देसाई, "माझा गाव" अनिलकुमार मेहता प्रकाशक, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, द्वितीयावृत्ती, ११ ऑगस्ट १९८०, पृ.१०.

२) तत्रैव पृ. १६.

३) तत्रैव, पृ. ६७.

४) तत्रैव, पृ. १११.

५) तत्रैव, पृ. १७४.

६) तत्रैव, पृ. १८८.

७) तत्रैव, पृ. १८९.

८) तत्रैव, पृ. २१८.

९) तत्रैव, पृ. ८.

१०) तत्रैव, पृ. २८.

११) तत्रैव, पृ. ३७.

१२) तत्रैव, पृ. ११३.

१३) तत्रैव, पृ. २३५.

१४) तत्रैव, पृ. ७१.

१५) तत्रैव, पृ. ७२.

१६) रणजित देसाई, "माझा गाव" अनिलकुमार मेहता प्रकाशक, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, द्वितीयावृत्ती, ११ ऑगस्ट १९८०,पृ.८३.

१७) तत्रैव, पृ. १५०.

१८) तत्रैव, पृ. २२९.

१९) आनंद यादव, "मराठी साहित्य समाज आणि संस्कृती", मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, प्रथमावृत्ती १९८५, पृ. १६८.

२०) गो.मा. पवार, "साहित्यातील प्रादेशिकता भाषा आणि निवेदन" निबंध.

......